ePaper
'आशीर्वादा'साठी पुन्हा पवारभेट! अजित पवार, समर्थक आमदारांच्या कृतीने संभ्रम

| वर्ष - 7 । अंक -77 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www .mahaenews.com | ।मंगळवार, दिनांक 18 जुलै 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews




## आतील पानांत

- ८० शाळा शिक्षकांविना!
- 9 मंत्री अपात्र ठरणार ?
- सेन्सेक्स ५५० अंकांनी उच्चांकावर
- कार्लोस अल्कारेज नवा चॅम्पियन


# धरणक्षेत्रात 'कृपेची' प्रतीक्षा!

## » गतवर्षीच्या तुलनेत साठा अर्ध्यावर: पवना धरण भरण्यासाठी 'देव पाण्यात'

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यात सर्वदूर पावसाची हजेरी असताना पिंपरी-चिंचवड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पवना धरणामध्ये गेल्या वर्षीच्या तुलनेत निम्मा जलसाठा उपलब्ध आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार, गेल्या वर्षी आजच्या तारखेला ६२.९१ टक्के पाणीसाठा उपलब्ध होता. त्या तुलनेने सध्या धरणामध्ये ३३.४३ टक्के इतका पाणीसाठा उपलब्ध आहे. त्यामुळे धरणक्षेत्रात वरुणराजाच्या 'कृपेची' आणखी प्रतिक्षा कायम आहे.**



पवना धरणामध्ये गतवर्षी आजच्या दिवशी ६२.९१ टक्के इतका पाणीसाठा असल्याने पिंपरी-चिंचवडकरांना चिंता करण्याची गरज नव्हती. परंतु, यावर्षी जुलैचा महिना सरत आला तरी पवना धरणातील जलसाठा निम्म्यावरही पोहोचलेला नाही. म्हणून पिंपरी-चिंचवडकरांच्या चिंतेत भर पडली आहे.

पिंपरी-चिंचवड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पवना धरणामध्ये ३३.४३ टक्के इतका जलसाठा उपलब्ध असल्याचं समोर आलेले आहे. एक जूनपासून पवना धरणातील पाणीसाठ्यात १५.५३ टक्के वाढ झालेली आहे. गेल्या वर्षी आजतागायत ६६० मिलिमीटर पाऊस झाला होता. जो यावर्षीच्या तुलनेत काही प्रमाणात कमी आहे.

यावर्षी धरण क्षेत्रात ७३६ मिलिमीटर इतका पाऊस झालेला आहे. मात्र, गेल्यावर्षी आजच्या तारखेला पवना धरणामध्ये ६२.९१ टक्के पाणीसाठा उपलब्ध होता. परंतु, यावर्षी केवळ ३३.४३ टक्के इतका पाणीसाठा उपलब्ध असल्याचं पुढे आलं आहे. त्यामुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी आजच्या तारखेला निम्मा जलसाठा असल्याचं बघायला मिळत आहे. एक जूनपासून ते आजतागायत ३३६ मिलिमीटर पाऊस झालेला आहे.

### मुसळधार पावसाचा इशारा...

»भारतीय हवामान विभागाने मुंबईसह ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, जळगाव, कोल्हापूर, सातारा, जालना, औरंगाबाद या जिल्ह्यांतील काही ठिकाणी मंगळवार 18 जुलै 2023 रोजी मध्यम ते मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. तसेच 21 जुलै 2023 पर्यंत राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी मध्यम ते मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला असून नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन राज्य शासनाने केले आहे

# शिष्यवृत्ती परीक्षेत दिशा पवार हिची उल्लेखनीय कामगिरी!

## » हवेली तालुक्यात तृतीय क्रमांक : माता अमृतामय विद्यालयाच्या विद्यार्थीनीचे यश

। पिंपरी । महाईन्यूज

**शैक्षणिक वर्ष 2022-23 मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती (स्कॉलरशिप) परीक्षेमध्ये निगडी येथील माता अमृतामय विद्यालयातील इयत्ता आठवीतील दिशा बबन पवार विद्यार्थ्यांनीने नेत्रदीपक यश मिळवत याही वर्षी हवेली तालुक्यातील मेरिट लिस्टमध्ये सहावा नंबर मिळविला आहे.**



इच्छाशक्ती प्रबळ असेल तर या जगात कोणतीही गोष्ट अशक्य नसते. ऑनलाइन क्लास करत दिशा पवार हिने पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा दिली. एकूण 300 पैकी 255 गुण मिळवून पुणे जिल्ह्यात 36 वा तर हवेली तालुक्यात सहावा नंबर मिळाला आहे.

यादीमध्ये सई मुळ्ये (85.90), श्रेया भिसे (85.90), सोहम चिंचोळकर (85.33), दिशा पवार (85.23), सशा बोंगळे (85.23), प्रद्युम्न शिंदे (84.66), श्रेया दीक्षित (84.66), पार्थ लोखंडे (84.66), अथर्व फालके (84.66), आभा वाळूंज (84.66), शंतनू नरुळे (84.56), सायली पांडे (84.56), पार्थ बोबडे (84.56), विवेक जगतपा (84), सार्थक गजरे (84), कृतिका सराटे (84), ओमकार नरके (84), वेदिका गोबरे (84), प्रणव निकम (83.33), श्रेयसी लकरे (83.22), अदित्य पिंपळे (83.22), प्रतीक चव्हाण (82.66), वेदांत पोखरकर (82.66), मोहीत पाठक (82.55), वेदांत धांदरे (82).

### शिक्षकांची व्यक्त केले समाधान...

»विद्यार्थ्यांच्या अथक परिश्रमाचे व कष्टाचे चीज झाल्याचे वर्ग शिक्षक यांनी समाधान व्यक्त केले. भावी काळात विद्यालयातील अनेक विद्यार्थी उच्चपदस्थ अधिकारी होतील आणि विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करून आपला, आपल्या पालकांचा आणि विद्यालयाचा नावलौकिक वाढवतील, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

# 80 शाळा शिक्षकांविना!

## पालिकेत समाविष्ट 34 गावांतील शिक्षक जिल्हा परिषदेकडे

### आदिवासी भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान

।पुणे/ जेजुरी ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पुणे जिल्हा परिषदेच्या अखत्यारितील ३ हजार ५६३ शाळांपैकी ८० शाळा शिक्षकांविना आहेत. तसेच १ हजार २४० शिक्षकांची कमतरता आहे. या पार्श्वभूमीवर पुणे महापालिकेमध्ये समाविष्ट झालेल्या ३४ गावांतील जिल्हा परिषद शाळांतील ५३४ शिक्षक जिल्हा परिषदेकडेच ठेवण्याची प्रस्ताव जिल्हा परिषदेने राज्य सरकारला दिला आहे.**



अलीकडेच पुणे महापालिकेत ३४ गावे समाविष्ट करण्यात आली. या गावांतील जिल्हा परिषदेच्या शाळांच्या हस्तांतरणाची प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नाही. पुणे जिल्हा परिषदेच्या अखत्यारित ३ हजार ५६३ शाळा आहेत. या शाळांमध्ये सहायक शिक्षक, पदवीधर शिक्षक, मुख्याध्यापक यांची एकूण ११ हजार ७४२ मंजूर पदे आहेत. त्यापैकी १० हजार ५०२ शिक्षक उपलब्ध आहेत. जिल्हा परिषद शाळांपैकी ८० शाळांमध्ये एकही शिक्षक उपलब्ध नाही. त्यामुळे दुर्गम भागातील, आदिवासी भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता आहे.

महापालिकेत समाविष्ट झालेल्या गावांतील शाळांच्या शिक्षकांनी महापालिकेत हस्तांरण होण्यासाठी महापालिकेमध्ये सेवा वर्ग करण्याची मागणी केली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्याच्या ग्रामीण भागात शिक्षकांची आवश्यकता असून, त्यामुळे महापालिकेत समाविष्ट झालेल्या ३४ गावांतील शाळांतील सुमारे ५३४ शिक्षकांचे हस्तांतरण न करता त्यांची नियुक्ती जिल्हा परिषदेकडेच ठेवण्याचा प्रस्ताव जिल्हा परिषद प्रशासनाने राज्य शासनाला दिला आहे.

### सर्वंकष वाहतूक आराखड्यात सुधारणा

» जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आयुष प्रसाद म्हणाले की, ग्रामीण भागातील प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षण मिळाले पाहिजे. कुणीही शिक्षणापासून वंचित राहता कामा नये. शाळांना शिक्षक उपलब्ध होत नसल्याने महापालिकेत समाविष्ट झालेल्या गावांतील शिक्षक जिल्हा परिषदेला मिळण्याचा प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर केला आहे.

# ‘बार्टी’तर्फे यूपीएससीची पूर्वतयारी

## 14 ऑगस्टपर्यंत अर्ज करा : सुनील वारे

। पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे मार्फत दिल्ली येथील नामांकित प्रशिक्षण संस्थांमध्ये राज्यातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी संघ लोकसेवा आयोग-नागरी सेवा परीक्षेसाठी निःशुल्क अनिवासी प्रशिक्षण (कोचिंग) राबविण्यात येणार आहे. त्याकरिता 14 ऑगस्टपर्यंत अर्ज मागविण्यात येत आहे.**




27 ऑगस्ट 2023 रोजी सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी) आयोजित करण्यात आली असून इच्छुक पात्र उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी WWW.SIAC.ORG.IN या संकेतस्थळास भेट द्यावी, असे आवाहन ‘बार्टी’चे महासंचालक सुनील वारे यांनी सोमवारी केले आहे. युपीएससी परीक्षेच्या पूर्व तयारी प्रशिक्षणासाठी दिल्लीतील केंद्रासाठी अनुसूचित जातीच्या 300 उमेदवारांची निवड करण्यात येईल.

त्यामध्ये ३० टक्के जागा महिलांसाठी, 4 टक्के जागा "दिव्यांग व्यक्तीसाठी, 5 टक्के जागा अनुसूचित जाती अंतर्गत वंचित जातीमधील (वाल्मिकी व तत्सम जाती- होलार, बेरड, मातंग, मांग, मादगी इ.) विद्यार्थ्यांकरिता आरक्षित असतील, एकूण जागांच्या ५% जागा विशेष बाब म्हणून राखीव ठेवण्यात येतील.

### लोणावळा पोलिसांची दमछाक

» उमेदवाराकडे महाराष्ट्रातील अनुसूचित जातीचा दाखला व अधिवास असावा, उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा,उमेदवाराचे वय संघ लोकसेवा आयोग-नागरी सेवा परीक्षेच्या अटी व शर्ती नुसार असावे,संघ लोकसेवा आयोगामार्फत सन 2024 मध्ये घेण्यात येणाऱ्या नागरी सेवा परीक्षेसाठी पात्र असावा, रुपये 8 लाखापर्यंत कौटुंबिक उत्पन्न मर्यादा असलेले उमेदवार प्रशिक्षणासाठी पात्र असतील.

# रेल्वेस्थानकावर उभ्या असलेल्या बोगीला आग

।पुणे। महाईन्यूज ।।

पुणे जिल्ह्यातील दौंड रेल्वे स्थानकावर उभ्या असलेल्या रेल्वेच्या बोगीला अचानक आग लागल्याची घटना समोर आली आहे. दौंड रेल्वे स्थानकाच्या फलाट क्रमांक सहाच्या बाजूला यार्ड ट्रॅकवर उभ्या असलेल्या रेल्वे रॅकच्या बोगीत अचानक आग लागली. या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र, ट्रेनचे मोठे नुकसान झाले आहे. दरम्यान, या घटनेचा व्हिडिओ देखील समोर आला आहे. दौंड रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक सहाच्या साइड यार्डजवळ उभ्या असलेल्या रेल्वे रॅकच्या बोगीत अचानक आग लागली. अचानक लागलेल्या आगीमुळे रेल्वे प्रशासनातील अधिकाऱ्यांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. मात्र आगीचे नेमके कारण अद्याप



समजू शकलेले नाही. दरम्यान, अग्निशमन दलाला घटनास्थळी पाचारण करण्यात आले असून आग विझवण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत.

या आगीत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. तरी देखील फायर ब्रिगेड येईपर्यंत त्या ठिकाणी पाईपमधून पाणी टाकून आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला गेला. दरम्यान, या घटनेचा व्हिडिओ देखील समोर आला आहे. आग लागताच रेल्वेस्थानाकातील इर्मजन्सी अलार्म वाजल्याने संबंधित स्थानकारील यंत्रणा देखील तत्काळ कामाला लागली.

# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा 'सर्वंकष वाहतूक आराखडा'!

## तब्बल 40 हजार कोटींच्या प्रकल्पांचे नियोजन : लघू, मध्यम, दीर्घकालीन उपायोजना

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे शहर, पिंपरी-चिंचवड आणि पीएमआरडीएच्या हद्दीत वाढलेली लोकसंख्या आणि अपुऱ्या पडणारी वाहतुक व्यवस्था यात सुधारणा करण्यासाठी २०१८ मध्ये तयार केलेला 'सर्वंकष वाहतूक आराखडा' अद्ययावत केला जाणार आहे. हे काम पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) करणार आहे.**




'पुणे एकीकृत महानगर परिवहन प्राधिकरण'च्या (पुम्टा) बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. २०१८ मध्ये पीएमआरडीएकडून पुणे, पिंपरी चिंचवडसह पीएमआरडीए हद्दीचा सर्वंकष वाहतूक आराखडा तयार करण्यात आला आहे. पुणे महानगर क्षेत्रातील वाहतूक सुरळीत करण्यासाठी लघू, मध्यम व दीर्घकालीन उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत. सुमारे ४० हजार कोटी रुपयांचे प्रकल्प या आराखड्यात सूचविण्यात आले आहेत.

त्यामध्ये मेट्रो, बीआरटी, मोनोरेल, निओ मेट्रो, उड्डाणपूल, भुयारी मार्ग याचा समावेश आहे. याच अहवालातील हिंजवडी ते शिवाजीनगर या मेट्रो प्रकल्पाचे काम पीएमआरडीएने हाती घेतले आहे. या मार्गाचे विस्तारीकरणा बरोबरच नवीन आठ मेट्रो मार्ग प्रस्तावित केले आहेत. तसेच पीएमआरडीकडून रिंगरोड केला जाणार आहे. हे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर पुणे शहर, पिंपरी चिंचवड व ग्रामीण भागात वाहतुकीसाठी रस्ते व सेवांचे जाळे निर्माण होणार आहे.

या वाहतूक आराखड्याचे दर पाच वर्षांनी आढावा घेऊन त्यात आवश्यक ते बदल करणे गरजेचे आहे. २०१८ मध्ये हा वाहतूक आराखडा तयार केल्यानंतर पुणे शहराची झालेली हद्दवाढ, तेथील वाहतुकीची गरज आणि सद्यःस्थिती यामध्ये बरीच तफावत आहे.

### खडकवासला- खराडी मेट्रोचा प्रस्ताव मुख्य सभेसमोर

खडकवासला ते हडपसर-खराडी या मेट्रो मार्गाचा डीपीआर मुख्य सभेच्या मान्यतेसाठी ठेवण्यात आला आहे. या प्रस्तावना जुलै महिन्याच्या मुख्यसभेत मान्यता दिली जाणार आहे. त्यानंतर हा प्रस्ताव राज्य सरकारच्या मान्यतेसाठी पाठवला जाईल. तेथे मान्यता मिळाल्यानंतर केंद्र सरकारकडे तो सादर केला जाईल तेथे मान्यता मिळाल्यानंतरच या प्रकल्पाचे प्रत्यक्षात काम सुरू होईल. ही सर्व वेळखाऊ प्रक्रिया महामेट्रोकडून पार पाडली जाणार आहे. काही महिन्यांपूर्वी महमेट्रोने खडकवासला-हडपसर-खराडी या मार्गाचा सर्वंकष वाहतूक आराखडा (डीपीआर) तयार केला होता. त्याची तपासणी केल्यानंतर स्थायी समितीमध्ये हा डीपीआर मान्य करून तो आता मुख्यसभेपुढे आणला आहे. त्याला मान्यता दिली जाईल, असे प्रशासक विक्रम कुमार यांनी सांगितले.

> सर्वंकष वाहतूक आराखड्यात दर पाच वर्षांनी अद्ययावत करण्याची तरतूद आहे. हा आराखडा २०१८ मध्ये तयार केलेला आहे. गेल्या पाच वर्षात पुणे शहराची झालेली हद्दवाढ, शहरासह ग्रामीण भागातील वाढलेली लोकसंख्या याचा विचार करता त्यानुसार या आराखड्यात प्रकल्पांची तरतूद करणे आवश्यक आहे. त्यामुळे 'पुम्टा'च्या बैठकीमध्ये सर्वंकष वाहतूक आराखडा अद्ययावत करण्यास मान्यता दिली आहे. हा आराखडा पीएमआरडीए करणार आहे.'
>
> **- विक्रम कुमार,** आयुक्त, पुणे महापालिका...

---

# राहुल कलाटेंनी घेतला मुख्यमंत्री शिंदे यांच्या नेतृत्वात काम करण्याचा निर्णय!

## खासदार श्रीरंग बारणे यांच्याशी चर्चा करून लवकरच शहरात मेळावा घेण्यात येणार

।पिंपरी ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड महापालिकेतील शिवसेनेचे माजी गटनेते राहुल कलाटे यांनी काल रविवारी (ता. १६) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. कलाटे यांच्यासह चार माजी नगरसेवकांनी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याचा निर्णय घेतला. आगामी काळात मुख्यमंत्री व खासदार श्रीरंग बारणे यांच्याशी चर्चा करुन लवकरच शहरात मेळावा घेण्यात येणार आहे.**

चिंचवड विधानसभा २०१९ च्या निवडणुकीतही उध्दव ठाकरे यांनी त्यांना उमेदवारी दिली नव्हती. २०२३ च्या पोटनिवडणुकीत कलाटे यांनी अपक्ष उमेदवारी लढविली होती. त्यांना सुरुवातीस महाआघाडीची उमेदवारी दिली जाणार होती. परंतु; ऐनवेळी त्यांची उमेदवारी कापली गेली. परंतु; कलाटे यांच्यामुळे तिरंगी लढत झाली. कलाटे पराभवानंतर शांतच होते. त्यांना राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार गट) आमंत्रण होते. परंतु; त्यांनी मुख्यमंत्री शिंदे यांचे नेतृत्व मान्य केले.

कलाटे यांच्या भेटीवेळी उद्योगमंत्री उदय सामंत उपस्थित होते. मुख्यमंत्री शिंदे यांच्याशी चर्चा झाल्यानंतर सामंत व कलाटे यांनी माध्यमांशी संवाद साधला. कलाटे यांच्या समवेत माजी नगरसेवक नवनाथ जगताप, संपत पवार, अश्विनी वाघमारे यांनीही शिंदे यांचे नेतृत्व मान्य केले.

### पोटनिवडणुकीत राहुल कलाटे यांचे डिपॉझिट जप्त

पोटनिवडणुकीत आघाडीचे संयुक्त उमेदवार नाना काटे यांना पाठिंबा देण्यासाठी उद्धव ठाकरेंसह अनेक नेत्यांनी मनधरणी करण्याचा प्रयत्न केला. मात्र राहुल कलाटे यांनी कोणाचेही न ऐकता अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला व त्यांचे डिपॉझिट जप्त झाले. निवडणुकीत भाजपच्या अश्विनी जगताप प्रचंड मतांनी निवडून आल्या. नाना काटे दुसऱ्या क्रमांकावर राहिले. राहुल कलाटे तेव्हापासून राजकारणात दुर्लक्षित झाले होते. त्यांच्यासाठी शिवसेनेचे दरवाजे बंद झाले. राष्ट्रवादीत सामील होऊ शकत नाही. भाजपमध्ये जगताप घराण्याचे वर्चस्व आहे. शेवटी त्यांनी सरकारसोबत जाणे पसंत केले. ते वेट अँड वॉचच्या भूमिकेत होता. ते बहुधा कॉंग्रेसमध्ये जातील अशीही चर्चा होती.



> सामंत यांनी माध्यमाशी बोलताना मुख्यमंत्री शिंदे व खासदार श्रीरंग बारणे यांच्याशी बोलन पुढील दिशा ठरविली जाईल, असे सांगितले. जनसामांन्यांशी जोडले जाणारे नेते अशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची राज्यात प्रतिमा निर्माण होत आहे. त्यांच्या नेतृत्वात काम करण्याचा निर्णय मी व माझ्या सहकार्यांनी घेतला आहे. पुढ दिशा कशी घ्यायची, पुढे कसे जायचे याची दिशा नेतेमंडळी ठरवतील.
>
> **- राहुल कलाटे,** माजी गटनेते, शिवसेना, पिंपरी चिंचवड महापालिका




# मणिपूरच्या शांततेत 'प्रचार'विघ्न



**मणिपूरमध्ये ३ मेपासून किमान १४० बळी घेणाऱ्या हिंसाचाराविषयी युरोपीय संसदे'ने ११ जुलै रोजी मंजूर केलेल्या चिंताव्यंजक ठरावाचा निषेध भारतीय परराष्ट्र खात्याने केलेला आहेच, पण यानिमित्ताने होणाऱ्या प्रचारालाही प्रत्युत्तर देणे आवश्यक आहे, असे मानणारा लेख..**

मणिपूरमधील हिंसाचार ही भारताची अंतर्गत बाब असूनही युरोपीय संसदेने त्यात हस्तक्षेप केला. गेल्या आठवड्यात फ्रान्समधील स्ट्रासबर्ग येथे झालेल्या अधिवेशनात, मणिपूर हिंसाचाराबद्दल सहा ठराव मांडले गेले आणि त्यातून प्रचारकी नमुनाच वाटण्याजोगा एक ठराव त्या युरोपीय प्रतिनिधींनी संमतही केला. या ठरावावर १५ मिनिटेसुद्धा चर्चा झाली नाही. युरोपीय संसदेतील काही उजव्या विचारसरणीच्या सदस्यांनी ख्रिश्चन आणि इतर अल्पसंख्याकांचा कथित छळ आणि हिंदू बहुसंख्याकवाद याविषयी आरोप केले. याही स्थितीत, जर्मनीच्या ग्रीन अलायन्सतर्फे युरोपीय संसदेचे सदस्य असलेले राइनहार्ड बुटिकोफर यांनी आग्रह धरला की 'भारताचा अपमान करण्यासाठी किंवा व्यापार वाटाघाटीविरुद्ध धमक्या देण्याची संधी म्हणून ठरावाचा वापर करू नये'. मायरेड मॅकगिनेस या 'युरोपियन कमिशन'मधील वित्तीय सेवा आणि भांडवली बाजारविषयक प्रतिनिधी आहेत. ठरावावरील चर्चेला उत्तर देताना त्यांनी "या अत्यंत तणावपूर्ण परिस्थितीला तोंड देण्यासाठी भारताने चौकशी आयोगाची स्थापना करण्यात आली आहे आणि व्यापक सहभागासह शांतता समिती स्थापन करण्यात आली आहे." याचा आवर्जून उल्लेख केला. 'भारत-युरोपीय संघटना मानवाधिकार संवाद' हा वार्षिक उपक्रम येत्या डिसेंबरात होईल, तेव्हा याची चर्चा करता येईलच, असेही त्यांनी सुचवून पाहिले.

तरीसुद्धा ठरावाच्या अंतिम मजकुरात वास्तविकतेपासून दूर असलेल्या खोडसाळ टिप्पण्या आहेतच. या असल्या ठरावामुळे काही जणांना मोदी सरकारची निंदा झाली म्हणून आनंद होतच असेल. पण आणखीही काही जण आहेत- जे असाही विचार करतील की, स्वीडन अथवा फ्रान्ससारख्या देशांबाबत असाच ठराव करण्याची पुरेपूर संधी असतानाही ती गमावून युरोपीय संघटनेच्या संसदेने जगातील अन्य सार्वभौम राष्ट्राच्या अंतर्गत बाबीत नाक का खुपसले, असा प्रश्न निश्चितपणे पडेल. याचे कारण, युरोपीय संघटनेच्या सदस्य देशांपुरतेच या 'युरोपीय संसदे'चे अधिकार आहेत. त्या संकेतांच्या बाहेर जाणे हे विचित्रच ठरते. असो. आता ठराव जर संमतच झाला आहे तर किमान, त्यातील प्रचारकी बाबींना तथ्यपूर्ण प्रत्युत्तर देणे आवश्यक आहे. मणिपूर पूर्वपदावर येत आहे. मैतेई आणि कुकी समाजांचे प्रतिनिधी दिल्लीत आहेत, शांतता-प्रस्थापनाचा सौहार्दपूर्ण मार्ग शोधण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांशी सल्लामसलत करत आहेत. जातीय संघर्षांमुळे झालेल्या खोल जखमा भरून येण्यास वेळ लागेल, हे खरेच. पण युरोपीय संसदेसह – देशांतर्गत आणि बाहेरील हस्तक्षेप आणि प्रचारकी कथनांमुळे ही शांतता-प्रक्रिया बिघडू शकते. मणिपूरची लोकसंख्या आणि भूगोल अद्वितीय आहे. मणिपूरची ६० टक्के लोकसंख्या राज्याच्या १० टक्के भूभागात- म्हणजे इंफाळ खोऱ्यात राहते, त्यामुळे जमिनीच्या वापरावर प्रचंड ताण पडतो. या राज्यात लोकसंख्याशास्त्रीय वैविध्य भरपूर दिसते. या लोकसंख्येत, ३० लाख मैतेईंचा वाटा ५३ टक्के आहे, नागांचा २३ टक्के आहे आणि कुकी लोकांचा वाटा सुमारे १६ टक्के आहे. मणिपूरमधील सुमारे आठ टक्के लोकसंख्या मुस्लीम आहे. मैतेई हे प्रामुख्याने हिंदू आहेत, पण त्यांच्यामध्ये ख्रिश्चन लोकसंख्या वाढत आहे – वेगवेगळ्या अंदाजानुसार या ख्रिस्ती मैतेईंचे प्रमाण पाच टक्के ते २० टक्के असू शकते. नागा आणि कुकींपैकी बहुतेक सगळेच ख्रिश्चन आहेत. बहुसंख्य मैतेई लोक इंफाळ खोऱ्यात राहतात. खोऱ्याच्या सभोवतालच्या टेकड्या कुकी वस्तीने व्यापलेल्या आहेत आणि त्यांच्याही पलीकडच्या भागांत नागांचे वास्तव्य आहे.

## संपादकीय »

### अभिनिवेश आणि आधार!

***भारत-रशिया-चीन व्हाया संयुक्त अरब अमिराती असे सध्याचे तेल व्यापाराचे समीकरण पंतप्रधानांच्या अमिराती भेटीमागे आहे.***

पंतप्रधान नरेंद्र मोदी फ्रान्सहून परतताना संयुक्त अरब अमिरातीस भेट देऊन आले; ते बरे झाले. याचे कारण या संयुक्त अरब अमिरातींपैकी सहा वसाहती 'मतपेटीद्वारे राजसत्ता' (इलेक्टेड मोनार्की) आहेत हे खचितच नाही. त्यामुळे या भेटीचा राजकीय अर्थ काढण्याची गरज नाही. दुबई, अबु धाबी आदी प्रदेश म्हणजे या एकेका राजघराण्याच्या खासगी मालमत्ता. त्यांचे नेते त्या त्या प्रदेशांचे अनभिषिक्त सम्राट. 'लोकशाहीची जननी' असणाऱ्या भारतास या सत्याचे अप्रूप असण्याचे कारण नाही. मोदी यांच्या या संयुक्त अमिराती भेटीत भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास सहभागी होते. पंतप्रधानांच्या परदेश भेटीत अन्य कोणी भारतीय वरिष्ठ हजर राहिला यातच या भेटीचे महत्त्व आहे. दास आणि अमिरातीच्या मध्यवर्ती बँकेचे प्रमुख यांच्यात परस्पर सहकार्याचा करार झाला. भारतीय रुपयात आंतरराष्ट्रीय व्यापारातील देणी देण्यास या कराराद्वारे गती येणे अपेक्षित आहे.

**मार्क झुकेरबर्ग यांच्या 'मेटा'नं "ट्विटर"ला शह देण्याच्या उद्देशानं 'थ्रेडस्' नावाचा नवा सोशल मीडिया प्लॅटफॉर्म लाँच केलाय. ॲलन मस्क यांनी ताबा घेतल्यापासून "ट्विटर"मध्ये अनेक बदल करण्यात आले असून त्याविषयी अनेकांचा नाराजीचा सूरही दिसतोय. त्या संधीचा फायदा घेत, इन्स्टाग्रामवरून थेट थ्रेड्सवर जाण्याचा शॉर्टकट देत थ्रेड्स सुरू झालंय. सोशल मीडियात त्यानं हलचल निर्माण केलीय.**

# 'ट्विटर'च्या चिमणीभोवती गुरफटणार?

थ्रेड्स.. आपले विचार जगासोबत शेअर करण्यासाठी उपलब्ध झालेल्या नव्या सोशल मीडियाचं हे नाव. हे नवीन ॲप स्टायलिश आणि इतरांपेक्षा वेगळं आहे. 'फेसबुक' या जगप्रसिद्ध सोशल नेटवर्किंग साईटचे संस्थापक मार्क झुकेरबर्ग यांनी हे नवे व्यासपीठ जगभरातील शंभर देशांमध्ये उपलब्ध करून दिलंय. सोशल मीडियाच्या क्षेत्रात अशी अनेक ॲप्स उपलब्ध असताना 'थ्रेडस्'ची चर्चा करण्याचं कारण म्हणजे हे थेट ट्विटरला टक्कर देणारं माध्यम म्हणून आणण्यात आलंय.




'ट्विटर'चे नवे मालक ॲलन मस्क आणि *मेटा'चे सर्वेसर्वा मार्क झुकेरबर्ग या आभासी जगातील दोन बड्या उद्योगपतींमधे 'थ्रेडस्'च्या आगमनामुळे संघर्षाची धार वाढणार आहे. थ्रेडसवर ट्विटरची नक्कल असल्याचा होत असलेला आरोपही होतोय. त्यामुळे एकीकडे कायदेशीर संघर्ष तर दुसरीकडे युझर्समधील लोकप्रियता अशा दोन्ही बाजूनं थ्रेड्सला स्वतःला सिद्ध करावं लागणाराय. ब्रिटिश-अमेरिकी पत्रकार आणि लेखक निक विल्टननं म्हटलं आहे की, ऑक्टोबर २००८ मध्ये ट्विटरच्या सीईओ पदावरून जॅक डोर्सी यांना हटविल्यानंतर त्याचे सहकारी सहसंस्थापक बिज स्टोन आणि ईव्ह विलियम्सने फेसबुकचे सीईओ मार्क झुकेरबर्ग यांची भेट घेतली. ही काही साधारण भेट नव्हती. भविष्यात निर्माण होणाऱ्या संघर्षाचे पडघम या भेटीतून वाजत होते. झुकेरबर्गच्या डोक्यात ट्विटरची मालकी मिळवण्याचा विचार होता. त्यावर झुकेरबर्ग आणि डोर्सी यांच्यात अनेक महिन्यांपासून चर्चा सुरू होती. फेसबुकला तत्कालीन काळात ५० कोटी डॉलरमध्ये ट्विटरची खरेदी करता आली नाही. मात्र त्याच वेळी झुकेरबर्गनं ट्विटरसारखे प्रॉडक्ट तयार करण्याचा सूचक इशारा दिला होता. वस्तुत: झुकेरबर्गच्या मनात ही गोष्ट अनेक वर्षांपासून घोळत होती, असे आता स्पष्ट होतंय. 'फेसबुक'चा उदय झाल्यानंतर जवळपास १५ वर्षांनंतर ५ जुलै २०२३ मध्ये मेटा कंपनीनं "थ्रेडस्' ॲप लाँच केलंय. लाँच केल्यानंतर काही तासांतच थ्रेडस् आपले सर्व विक्रम मोडले. रात्रीतूनच लाखो यूजर्सनी हे ॲप मोबाईलमध्ये डाऊनलोड केले. आतापर्यंत सर्वात वेगाने वाढणारा ॲप म्हणून थ्रेडसची नोंद झालीय. इन्स्टाग्राम प्रोफाईलवर दिसणाऱ्या संख्येच्या आधारावर सध्या थ्रेडस् ॲपवर ९.७ कोटींहून अधिक अकाऊंटस् तयार झाल्याचे दिसत आहे. तर या ॲपची घोषणा होताच केवळ दोन तासांतच २० लाख लोकांनी खाते उघडले होते. तर ७ तासांत १ कोटी यूजर्सची झुंबड उडाली.

## ।। अभंगवाणी ।।



राजस सुकुमार मदनाचा पुतळा ।  
रविशशिकळा लोपलिया ॥१॥

कस्तुरीमळवट चंदनाची उटी ।  
रुळे माळ कंठीं वैजयंती ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# 9 मंत्री अपात्र ठरणार?

## अजित पवारांना घोर; बंडखोरांनी पुन्हा घेतली शरद पवारांची भेट

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी पक्ष एकसंध राहावा यासाठी अजित पवार गटाच्या बंडखोरांनी सोमवारी पुन्हा पक्षाध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतली. पवार यांचे मन वळविण्याचे प्रयत्न उपमुख्यमंत्री अजित पवार गटाने सुरू ठेवले आहेत. लागोपाठ दुसऱ्या दिवशी बंडखोर गटाचे आमदार शरद पवारांना भेटल्याने राजकीय वर्तुळात संभ्रम आणि संशय निर्माण झाला आहे.**



मात्र, भाजपला पाठिंबा देणार नाही या भूमिकेवर शरद पवार ठाम असल्याचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी स्पष्ट केले. विधिमंडळाच्या उभय सभागृहांचे कामकाज पार पडल्यावर अजित पवार आणि प्रफुल्ल पटेल यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादीचे आमदार शरद पवार यांची भेट घेण्यासाठी मंत्रालयासमोरील यशवंतराव चव्हाण केंद्रात पोहोचले.

त्यावेळी तेथे शरद पवार उपस्थित नव्हते. पण १० ते १५ मिनिटांत पवार तेथे आले. बंडखोर आमदारांनी पवारांशी संवाद साधला. राष्ट्रवादीच्या मंत्र्यांनी रविवारी पवार यांची भेट घेऊन पक्ष एकसंघ ठेवण्याकरिता प्रयत्न करण्याचे आवाहन केले होते. त्यावर पवारांनी कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त केली नव्हती. भाजपबरोबर जाण्याचा प्रश्नच नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते. तरीही सोमवारी दुपारी अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली बंडखोर आमदारांनी पवारांची भेट घेतली.

पवारांनीही त्यांचे म्हणणे ऐकून घेतले, असे सांगण्यात आले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा शरद पवार यांनी मेहनत घेऊन उभे केलेले एक कुटुंब आहे. पक्षाचे आमदार, काही लोक भेटण्यासाठी आले होते. पवार प्रत्येकाला भेटत असतात. राजकारणात संवादाला महत्त्व आहे. पवारांनी आपली भूमिका येवला सभेत स्पष्ट केली आहे. यापूर्वी काँग्रेस आणि राष्ट्रवादीने एकत्रित निवडणुका लढवल्या आहेत. त्यानंतर अडीच वर्षे शिवसेनेबरोबर एकत्र काम केले आहे. त्यामुळे पवारांच्या भूमिकेबद्दल प्रश्न उपस्थित होऊ शकत नाही, असेही जयंत पाटील यांनी स्पष्ट केले.

### भेटीवर टीका...

» राष्ट्रवादीतील बंडानंतर लागोपाठ दुसऱ्या दिवशी बंडखोरांनी शरद पवार यांची भेट घेतल्याबद्दल राजकीय वर्तुळात प्रतिक्रिया उमटल्या. शरद पवार यांनी बंडखोरांची भेट घेणे टाळायला हवे होते, असे मत विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे आणि काँग्रेसच्या यशोमती ठाकूर यांनी व्यक्त केले.

# भाजपचे 'एक सही भविष्यासाठी'

## एक सही संतापाची विरुद्ध भाजपची मोहीम

। मुंबई ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पंतप्रधाननरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र आणि राज्य सरकार युवकांच्या भविष्यासाठी काम करत आहे. याचा आम्हाला अभिमान आहे, म्हणून एक सही भविष्यासाठी या अभियानांतर्गत शहरातील सर्व महाविद्यालयामध्ये ही मोहीम राबविण्यात येणार असल्याचे मुंबई भाजपचे अध्यक्ष आशिष शेलार यांनी सांगितले. या माध्यमातून त्यांनी मनसे आणि उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला. मनसेच्या मोहिमेला हे भाजपचे उत्तर असल्याचे बोलले जात आहे.**



### काय म्हणाले शेलार

» या संदर्भात आशिष शेलार म्हणाले की, 'देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील तरुणांचे भविष्य घडवण्याच्या दृष्टीने राबवलेल्या योजना, IIM सारखी संस्था मुंबईमध्ये सुरू करण्यासंदर्भात घेतलेले निर्णय तरुण पिढीपर्यंत पेहोचावेत यासाठी विविध महाविद्यालयांमध्ये 'एक सही भविष्यासाठी' हे अभियान सुरू केले आहे. आज मुंबईतील रुईया महाविद्यालयात ही मोहिम राबवण्यात येत आहे. याला कॉलेजमधील विद्यार्थ्यांचा भरभरून पाठिंबा मिळत आहे.'

गेल्या काही दिवसांपासून राज्यात सुरु असलेल्या राजकीय उलथापालथीवर मनसेकंडून काही दिवसांपासून एक सही संतापाची ही मोहीम राबविली जात आहे. या मोहिमेच्या माध्यमातून राज्यभरातील मतदारांना आकर्षित करण्याचा मनसेचा प्रयत्न आहे.

या मोहिमेत राज्यभरातील नागरिक स्वाक्षरी करुन आपला संताप व्यक्त करत आहेत. राज ठाकरे यांनी देखील या आंदोलनात सहभाग नोंदवला. मनसेच्या या संतापाच्या स्वाक्षरी मोहिमेला भाजपकडून एक सही भविष्यासाठी ही मोहीम सुरु करुन उत्तर देण्यात आले आहे.

यावेळी मुंबई भाजपचे अध्यक्ष आशिष शेलार यांनी मनसे आणि उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला. या मोहीमेतून कोणाच्याही मोहीमेला उत्तर नसून, आम्ही विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी ही मोहीम राबवत असल्याचे ते म्हणाले.

# 'मशाल' कुणाची

। मुंबई ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

शिवसेनेच्या ठाकरे गटाच्या मशाल या निवडणूक चिन्हावर सोमवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. पण कोर्टाने या प्रकरणी आव्हान याचिका दाखल करणाऱ्या समता पार्टीकडे योग्य ते दस्तऐवज नसल्यामुळे प्रकरणाची सुनावणी 6 आठवड्यांसाठी लांबणीवर टाकली. ठाकरे गटाला मिळालेल्या 'धगधगती मशाल' चिन्हावर दिवंगत जॉर्ज फर्नांडिस यांच्या समता पार्टीने दावा केला आहे. 1996 पासून हे चिन्ह आपल्याकडे असल्याचे नमूद करत समता पक्षाने निवडणूक आयोगाकडे धाव घेतली होती. समता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तृणेश देवळेकर यांनी ठाकरे गटाच्या मशाल चिन्हावर आक्षेप घेतला होता. निवडणूक आयोगानंतर हा वाद उच्च न्यायालयात आणि आता सर्वोच्च न्यायालयात पोहोचला आहे. शिवसेनेच्या



धनुष्यबाण चिन्हावरून ठाकरे व शिंदे गटात जोरदार रस्सीखेच सुरू आहे. सर्वोच्च न्यायालय तसेच निवडणूक आयोगापुढेही हा वाद सध्या सुरू आहे. या वादामुळेच शिवसेना पक्षाचे नाव आणि चिन्ह तात्पुरते गोठवल्यानंतर निवडणूक आयोगाने उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे गटासाठी नवीन चिन्ह व नवीन नावाचे वाटप केले. उद्धव ठाकरे गटाला 'शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)' हे नाव तर 'धगधगती मशाल' हे चिन्ह देण्यात आले. शिंदे गटाला 'बाळासाहेबांची शिवसेना' हे नाव व ढाल-तलवार हे चिन्ह देण्यात आले. केवळ अंधेरी पोटनिवडणुकीसाठी दोन्ही गटांना हे चिन्ह व नाव देण्यात आले होते.

# सेन्सेक्स 550 अंकांनी उच्चांकावर

## » जागतिक बाजारातून सकारात्मक संकेत; निफ्टी 19,700 पार

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हकडून व्याजदरवाढीला विराम देण्याची शक्यता आणि आयटी स्टॉक्समधील तेजीच्या जोरावर भारतीय शेअर बाजारातील सेन्सेक्स आणि निफ्टीने आज नवा उच्चांक नोंदवला. आजच्या ट्रेडिंग सत्रात सेन्सेक्सने ५५० अंकांनी वाढून ६६,६१६ वर झेप घेतली. तर निफ्टीने पहिल्यांदाच १९,७०० चा टप्पा पार केला. त्यानंतर सेन्सेक्स ५२९ अंकांच्या वाढीसह ६६,५८९ वर तर निफ्टी १५५ अंकांनी वाढून १९,७२१ वर बंद झाला.**

आयटी आणि बँकिंग क्षेत्रातील शेअर्समध्ये जोरदार खरेदी दिसून आली. त्याशिवाय फार्मा स्टॉक्सही तेजीत राहिले. ऑटो वगळता इतर सर्व क्षेत्रीय निर्देशांकांनी हिरव्या चिन्हात व्यवहार केला आणि बँक निर्देशांक २ टक्क्यांनी आणि निफ्टी बँक निर्देशांक १ टक्क्यांनी वाढला. बीएसई मिडकॅप निर्देशांक ०.३ टक्क्यांनी वाढला आणि स्मॉलकॅप निर्देशांक १ टक्के वाढला.

सेन्सेक्स आज ६६,१४८ वर खुला झाला होता. त्यानंतर त्याने ६६,६५६ अंकांपर्यंत वाढ नोंदवली. सेन्सेक्सवर एसबीआय, विप्रो, रिलायन्स, एचडीएफसी बँक, कोटक बँक, टेक महिंद्रा, आयसीआयसीआय, मारुती, एशियन पेंट्स, मारुती, ॲक्सिस बँक हे शेअर्स वाढले. तर टाटा मोटर्स, भारती एअरटेल, जेएसडब्लू स्टील, एम अँड एम, टीसीएस हे शेअर्स घसरले.



### शेअर बाजारातील तेजीची प्रमुख कारणे

- » जागतिक बाजारातून सकारात्मक संकेत
- » डॉलरच्या तुलनेत रुपयात सुधारणा
- » परदेशी गुंतवणूकदारांकडून खरेदीचा ओघ कायम
- » अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हकडून व्याजदरवाढीला विराम देण्याची शक्यता
- » हेविवेट स्टॉक्समध्ये गुंतवणूक कायम

एचडीएफसी बँकेने चालू आर्थिक वर्षाच्या एप्रिल-जून तिमाहीत ११,९५१ कोटी रुपयांचा निव्वळ नफा नोंदवला आहे. ३० जून २०२२ रोजी संपलेल्या तिमाहीत बँकेचा नफा ९,१९६ कोटी रुपये होता. त्यात आता वाढ झाली आहे. या पार्श्वभूमीवर एचडीएफसी बँकेचा शेअर आज २ टक्के वाढून १,६७८ रुपयांवर पोहोचला.

दरम्यान, हाऊसिंग डेव्हलपमेंट फायनान्स कॉर्पोरेशन (एचडीएफसी) आणि एचडीएफसी बँक यांच्या विलीनीकरणानंतर एचडीएफसी बँकेने जागतिक पातळीवर मोठा टप्पा पार केला आहे. भारतातील खासगी क्षेत्रातील सर्वात मोठी कर्जदार असलेल्या या बँकेने सोमवारी १०० अब्ज डॉलर बाजार भांडवल असलेल्या कंपन्यांच्या विशेष जागतिक क्लबमध्ये स्थान मिळवले.

तसेच सुमारे १५१ अब्ज डॉलर म्हणजेच १२.३८ लाख कोटी बाजार मूल्यावर व्यवहार करत आता एचडीएफसी बँक ही मॉर्गन स्टॅनली आणि बँक ऑफ चायना पेक्षा मोठी जगातील सातव्या क्रमांकाची कर्जदार बँक बनली आहे.

भारतीय स्टॉक ब्रोकर फर्म एंजेल वनचे शेअर्स आज ५ टक्क्यांनी घसरले. नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडियाने या स्टॉक ब्रोकरला सहा महिन्यांसाठी नवीन अधिकृत व्यक्तींना ऑनबोर्डिंग करण्यास मनाई केल्यानंतर आणि विद्यमान लोकांच्या ऑपरेशन्सवर देखरेख ठेवण्यात अपयशी ठरल्याचा आरोप करत दंड ठोठावला आहे. या पार्श्वभूमीवर एंजेल वनचे शेअर्स खाली आले. दरम्यान, आशियाई बाजारात कमजोरी दिसून आली. शुक्रवारी अमेरिकेतील शेअर बाजारात संमिश्र वातावरण राहिले होते.

---

# कोर्टाला पोस्ट ऑफिस केले

## » सुप्रीम कोर्टात वंदे भारत बंद करण्याची मागणी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केरळचे वकील पीटी शीजिश यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करून तिरुवनंतपुरम-कासारगोड वंदे भारत बंद करण्याची मागणी केली होती. याचिका फेटाळताना कोर्टाने म्हटले-तुम्ही लोकांनी कोर्टाला पोस्ट ऑफिस बनवले आहे.**

ट्रेन कुठे थांबायची हे कोर्टाने ठरवावे असे तुम्हाला वाटते? आता दिल्ली ते मुंबई राजधानीच्या स्थानकांवरही निर्णय घेणार का? ही धोरणात्मक बाब आहे, आम्ही ती ऐकणार नाही. सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड, न्यायमूर्ती पीएस नरसिम्हा आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने ही टिप्पणी केली. वकिलाने यापूर्वी केरळ उच्च



न्यायालयात याचिका दाखल करून हीच मागणी केली होती. त्यांची याचिका उच्च न्यायालयाने फेटाळून लावली. न्यायमूर्ती बेचू कुरियन थॉमस आणि न्यायमूर्ती सी. जयचंद्रन यांच्या खंडपीठाने सांगितले होते- ट्रेन कुठे थांबायची आणि ती कोणत्या स्थानकांवर असावी हे रेल्वे ठरवते. अशा



ठिकाणी स्टेशन बांधण्याची मागणी करण्याचा अधिकार कोणालाही नाही. त्यानंतर याचिकाकर्त्याने हायकोर्टाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. याचिकाकर्ते पीटी शीजिश यांना फटकारताना सीजेआय म्हणाले- आम्ही यावर निर्णय घेऊ शकत नाही, यासाठी अधिकाऱ्यांकडे जा.

### पंतप्रधानांचा वंदे भारताला हिरवा झेंडा

याचिकाकर्ता तिरूर येथे बनवण्याची मागणी करत असलेला वंदे भारत थांबा 24 एप्रिल 2023 रोजी पंतप्रधान मोदींनी झेंडा दाखवला होता. ही ट्रेन तिरुअनंतपुरम, कोल्लम, कोट्टायम, एर्नाकुलम, थ्रिसूर, पलक्कड, पठानमथिट्टा, मलप्पुरम, कोझिकोड यांसारख्या 11 जिल्ह्यांचा समावेश करते.

यावर याचिकाकर्त्याने युक्तिवाद केला - न्यायालय निर्णय घेऊ शकत नसेल तर किमान सरकारला याबाबत सूचना देऊ शकते. त्यावर उत्तर देताना खंडपीठाने म्हटले की, आम्ही सरकारला काही निर्देश दिल्यास आम्ही या प्रकरणाची सुनावणी घेतली आहे, असे मानले जाईल. याचिकाकर्त्याचा दावा आहे की, सुरुवातीला रेल्वेने वंदे भारत एक्स्प्रेसचा थांबा म्हणून तिरूर रेल्वे स्थानकाची घोषणा केली होती. नंतर राजकीय कारणांमुळे निर्णय बदलण्यात आला आणि पलक्कड जिल्ह्यातील शोर्नूर येथे वंदे भारत स्टेशन बांधण्यात आले. याचिकाकर्त्याचे म्हणणे आहे की, हे स्थानक तिरूरपासून सुमारे 56 किमी अंतरावर आहे. तिरूरमध्ये वंदे भारत स्टेशन नसणे हा मलप्पुरमच्या लोकांवर अन्याय आहे. जनहितार्थ मी ही याचिका दाखल केली होती.

# 2400 कोटींच्या ड्रग्सची होळी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सोमवारी बेंगळुरू येथे अंमली पदार्थांची तस्करी आणि राष्ट्रीय सुरक्षा या विषयावरील प्रादेशिक परिषदेचे अध्यक्षपद भूषवले. या परिषदेत 5 दक्षिण आणि 3 केंद्रशासित प्रदेशातील प्रतिनिधी सहभागी झाले होते. यादरम्यान देशाच्या विविध भागात 1,235 कोटी रुपयांचे 9,298 किलो ड्रग्ज जाळण्यात आले.**

अमित शहा यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे त्यावर लक्ष ठेवले. या परिषदेत राष्ट्रीय संरक्षण विद्यापीठ आणि कर्नाटक सरकार यांच्यात शिवमोग्गा येथे विद्यापीठ स्थापन करण्यासाठी करारावर स्वाक्षरी करण्यात आली. परिषदेला संबोधित करताना अमित शहा म्हणाले की, पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली सरकारने अमली पदार्थमुक्त भारत निर्माण करण्यासाठी अंमली पदार्थांविरुद्ध झिरो टॉलरन्स धोरण स्वीकारले आहे. केंद्रीय गृहमंत्री म्हणाले- 1 जून 2022 पासून देशात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव सुरू झाला.

ज्या अंतर्गत 75 दिवसांच्या मोहिमेत 75,000 किलो ड्रग्ज नष्ट करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले होते. तथापि, आम्ही आतापर्यंत 8,409 कोटी रुपयांचे 5,94,620 किलो ड्रग्ज नष्ट केले आहेत, जे लक्ष्यापेक्षा कितीतरी पटीने जास्त आहे. त्यापैकी 3,138 कोटी रुपयांचे (1,29,363 किलो) ड्रग्ज एकट्या एनसीबीने नष्ट केले आहेत.

अमित शह म्हणाले की, अमली पदार्थांची तस्करी ही केवळ राज्य किंवा केंद्राची नसून ती राष्ट्रीय समस्या आहे. याला सामोरे जाण्यासाठी जिल्हा आणि राज्य पातळीवर काम करण्याची गरज आहे.

# शिवांगी झाली पत्रकार

टीव्ही मनोरंजन विश्वातील प्रसिद्ध अभिनेत्री शिवांगी जोशी ही नेहमीच चाहत्यांच्या गप्पांचा विषय असते. सोशल मीडियावर शिवांगीची एक झलक चाहत्यांना सुखावून जाते. तिचा चाहतावर्ग मोठा आहे. तिला फॉलो करणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. फेसबूक, इंस्टावर शिवानी ॲक्टिव्ह असल्याचे दिसून आले आहे.शिवानीनं तिच्या बरसाते - मौसम प्यार का या मालिकेतून प्रेक्षकांना जिंकून घेतले आहे. गेल्या काही दिवसांपासून शिवानीच्या एका बातमीनं लक्ष वेधून घेतलं आहे. एका न्यूजरूमच्या पार्श्वभूमीवर बेतलेल्या या मालिकेत रेयांश (कुशाल टंडन) आणि आराधना (शिवांगी जोशी) या दोन हेकेखोर व्यक्तींमधील वादळी रोमान्सचे चित्रण आहे. भावनांच्या गुंत्यात अडकलेल्या रेयांश आणि आराधनाची ही गोष्ट आहेपहिल्या एपिसोडमध्ये प्रेक्षकांनी बघितले की, आराधना ही धडाडीची पत्रकार रेयांशच्या वडिलांविषयी एका सनसनाटी स्टोरीचे रिपोर्टिंग करते. रेयांश आणि आराधना यांची व्यक्तिमत्वं अगदी विरुद्ध असल्याने त्यांच्यात कामावरून वारंवार खटके उडतात, व्यावसायिक आणि वैयक्तिक पातळीवर देखील. पण आराधना रेयांशबरोबर काम करू लागते, तसा तिला त्याचा जवळून परिचय होतो आणि त्याची एक वेगळी बाजू तिला दिसू लागते व त्यामुळे त्याच्याबद्दलचे तिचे मत हळूहळू बदलू लागते. आणि धोक्याच्या अनेक सूचना मिळत असतानाही ती त्याच्याकडे आकर्षित होते. एका उत्साही आणि दृढनिश्चयी पत्रकाराची भूमिका करताना आणि बरसातें – मौसम प्यार का मालिकेत आराधनाच्या भूमिकेतून या नवीन व्यवसायाचा शोध घेताना शिवांगी रोमांचित आहे. आपला अनुभव सांगताना शिवांगी जोशी म्हणते, “पत्रकारितेविषयी मला पहिल्यापासून खूप आकर्षण वाटत आले आहे, पण आराधनाची व्यक्तिरेखा साकार करू लागल्यावर माझा पत्रकारांविषयीचा आदर अनेक पटींनी वाढला आहे. हे फारच किचकट काम आहे कारण आपल्या अवतीभोवती के घडते आहे याच्या बातम्या पुरवण्यासाठी पत्रकार वाट्टेल ते करत असतात.माझ्या अभिनय करकीर्दीमुळे माझ्या आसपास अनेक पत्रकार असतात. या व्यवसायाविषयी सखोल माहिती मिळवण्यासाठी मी माझ्या खास मीडिया मित्रांशी संपर्क साधला. प्रश्न विचारण्याचे त्यांचे तंत्र, त्यांची देह बोली, आवाजातील चढ-उतार यांचे निरीक्षण केले आणि आराधना ही व्यक्तिरेखा साकारण्यासाठी त्याचा उपयोग करून घेतला. मला आशा आहे की या भूमिकेला मी योग्य न्याय देऊ शकेन.” ती पुढे म्हणाली, “आराधना सद्वर्तनी आहे. सत्याचा आवाज बनण्याचा तिचा प्रयत्न आहे आणि पत्रकारिता हा तिचा आवडीचा विषय आहे. ती सहजासहजी हार मानत नाही आणि खरी बातमी मिळवण्यासाठी कितीही कष्ट घेण्याची तिची तयारी असते. ती सनसनाटी बातमीच्या शोधात असते आणि लोकांना प्रत्येक स्टोरीची खरी बाजू दाखवण्याचा तिचा अट्टाहास असतो. या उत्साहाने ती सळसळत असते. आराधनाचा हा गुण म ल ा माझ्या स्वतःच्या आयुष्यात देखील प्रतिबिंबित झालेला दिसतो.



## वरुण-जान्हवीचं खास सरप्राईज!

बॉलीवूडमध्ये अल्पावधीच आपल्या नावाची वेगळी ओळख वरुण आणि जान्हवीनं तयार केली आहे. गेल्या काही वर्षापासून हे दोन्ही सेलिब्रेटी लाईमलाईटमध्ये आले आहेत. वरुणचा भेडिया नावाचा मुव्ही प्रदर्शित झाला होता त्याला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला होता.आता त्याचा बवाल नावाचा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. दुसरीकडे जान्हवी आता साऊथमध्ये प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यास तयार आहे.'वरुण धवन' आणि 'जान्हवी कपूर' यांच्या आगामी चित्रपट 'बावल' चाहत्यांमध्ये उत्सुकता दिवसेंदिवस वाढत आहे. चित्रपटाचा जबरदस्त ट्रेलर लॉन्च झाल्यापासूनच 'जान्हवी' आणि 'वरुण' ची सुपर केमिस्ट्री मोठ्या पडद्यावर पाहण्यासाठी प्रेक्षक उत्सुक आहेत. 'वरुण' आणि 'जान्हवी' यांनी त्यांच्या फॅन्स असंख्य विनंत्या लक्षात घेऊन चित्रपटाच्या विशेष स्क्रीनिंगचे आयोजन केले होते जे चित्रपटाच्या जागतिक प्रीमियरपूर्वी चित्रपट पाहण्यासाठी पहिल्या काही लोकांपैकी होतेशेवटी 'वरुण' आणि 'जान्हवी' च्या एंट्रीने बावल स्क्रीनिंग आणखी रंगतदार झाले. त्यांनी चाहत्यांशी संवाद साधला, त्यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली, त्यांच्यासोबत काही वेळ व्यतीत केला. सेल्फीही काढले. आता त्यानं चाहत्यांना एक वेगळे सरप्राईज दिले आहे.'अश्विनी अय्यर तिवारी' आणि 'नितेश तिवारी' यांच्या 'अर्थस्काय पिक्चर्स' यांच्या संयुक्त विद्यमाने 'साजिद नाडियाडवाला' च्या प्रोडक्शन बॅनर 'नाडियादवाला ग्रँडसन' एंटरटेनमेंटची 'वरुण धवन' आणि 'जान्हवी कपूर' अभिनीत, 'बावल' ही एक कालातीत

## हाऊसफुल्ल 'बाईपण'



मराठी मनोरंजन विश्वात सध्या एका चित्रपटानं मोठी कामगिरी केली आहे. प्रसिद्ध दिग्दर्शक केदार शिंदे यांच्या बाईपण भारी देवा या चित्रपटानं विक्रमी कमाई केली आहे. गेल्या दोन आठवड्यांपासून बॉक्स ऑफिसवर या चित्रपटानं प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. त्याची मोठी चर्चा सुरु झाली आहे. एकीकडे बॉलीवूच्या चित्रपटांकडे वाढणारा प्रेक्षकांचा ओघ, आणि त्यातून हिंदी चित्रपटांची होणारी कमाई टॉलीवूड्या चित्रपटांच्या दृष्टीनं मोठी असली तरी यासगळ्यात मराठी चित्रपटांनी बाजी मारली आहे. केदार शिंदे यांच्या यापूर्वीच्या महाराष्ट्र शाहीर या चित्रपटाला प्रचंड प्रतिसाद मिळाला होता. खरं तर कोरोनाच्या काळातच बाई पण भारी देवाचे चित्रिकरण पूर्ण झाले होते. मात्र या चित्रपटाला कोरोनाचा मोठा फटका बसला होता. त्यानंतर शिंदे यांनी आता हा चित्रपट प्रदर्शित केला आहे. महाराष्ट्रातल्या प्रमुख शहरांतील थिएटरमध्ये महिलांचा बाईपण भारी देवाला मोठा प्रतिसाद मिळाला आहे. थिएटरमध्ये महिलांची प्रचंड गर्दी होत आहे. केवळ पाच कोटींचे बजेट असणाऱ्या या चित्रपटानं आतापर्यंत पन्नास कोटींपेक्षा जास्त कमाई केल्याचे दिसून आले आहे. यावर्षी सर्वाधिक कमाई करणाऱ्या मराठी चित्रपटांमध्ये बाईपण भारी देवाचे नाव पहिल्या तीनमध्ये आहे. यावरुन या चित्रपटाची लोकप्रियता आणि त्याला मिळालेला प्रतिसाद लक्षात येईल.

## 'जेलर' रिलीजपूर्वीच वादात!

दक्षिणेतील सुपरस्टार रजनीकांत हे केवळ साउथमध्येच नव्हे तर पुर्ण भारतात लोकप्रिय आहेत. त्यांची लोकप्रियता भारताबाहेरही आहे. रजनीकांत यांचे चाहते त्यांच्या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत असतात. त्यातच आता त्यांचा जेलर हा चित्रपटही गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहे. या चित्रपटातील तमन्नाच्या गाण्याची खुपच चर्चा रंगली होती. मात्र जसं बॉलिवूडमध्ये चित्रपट रिलिजपुर्वी काही ना काही नवा वाद रंगतो तसचं काहीसं आता टॉलिवूडमध्येही घडतांना दिसत आहे. सुपरस्टार रजनीकांत यांचा 'जेलर' हा चित्रपट 10 ऑगस्टला थिएटरमध्ये दाखल होणार आहे. मात्र चित्रपटाच्या प्रदर्शनापुर्वीच हा चित्रपट अडचणीत सापडला आहे. एका मल्याळम चित्रपटाच्या निर्मात्यांनी या चित्रपटाच्या नावात बदल करण्याची मागणी केली आहे.मल्याळम चित्रपट 'जेलर'चे दिग्दर्शक सकीर मदाथिल यांनी रजनीकांतच्या 'जेलर'च्या निर्मात्यांना चित्रपटाचे टायटलमध्ये बदल करण्यास सांगितलं आहे. या मल्याळम 'जेलर' हा पिरियड थ्रिलर चित्रपट असून त्यात श्रीनिवासन दिसणार आहे. एकाच टायटलचे दोन सिनेमे एकाच वेळी प्रदर्शित झाल्यावर प्रेक्षक गोंधळात पडतील म्हणुन मल्याळम दिग्दर्शकाने नाव बदलण्याची विनंती केली.



## 'मी हेमा इतकी सुंदर नाही

बागबान हा चित्रपट काही मुव्ही चॅनलला नेहमी दिसून येतो. या चित्रपटानं प्रेक्षकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले आहे. बॉलीवूडचे बिग बी अमिताभ बच्चन, हेमा मालिनी यांच्या भूमिकेनं बागबानची उंची वाढवली होती.बागबानमध्ये हेमा मालिनी आणि अमिताभ यांची केमिस्ट्री पाहून प्रेक्षक भारावून गेले होते. त्याची बराचकाळ चर्चाही झाली होती. बागबान हा २००३ मधील एक सर्वाधिक लोकप्रिय चित्रपटांपैकी एक होता. त्याला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता. त्यातील कथा प्रेक्षकांना भावली होती. आई, वडील आणि मुलं यांच्यातील वेगळं नातं या चित्रपटाच्या निमित्तानं समोर आलं होतं. त्यावेळी अमिताभ मुळे धर्मेंद्र यांनी हेमा मालिनी यांचा तो चित्रपट पाहिला नसल्याची बातमी समोर आली होती. बागबान प्रदर्शित झाल्यानंतर अशी एक चर्चा होती की, हेमा मालिनी यांना ती भूमिका मिळाल्यानंतर जयाजी नाराज होत्या. त्यांना त्याविषयी विचारले होते. तुम्हाला हेमाजी यांची ती भूमिका मिळाली असती तर काय आनंद झाला असता का, यावर जयाजी यांचे मौन खूप काही सांगून जाणारे होते. पण जयाजी यांनी हेमाजी यांचे कौतूक केले होते. त्या एवढ्या सुंदर दिसत होत्या की, त्यांच्यापुढे मी काहीच नाही. असे म्हटले होते. जया बच्चन यांनी म्हटले की, हेमाजी खूप सुंदर आहेत. पण त्या सुंदर आहेत तर त्यांना तसे का म्हणू नये.

# ऑस्ट्रेलियाचा 3 धावांनी विजय!

## » नतालीला 6 चेंडूत 15 धावा करता आल्या नाही

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**महिला ॲशेसच्या एकदिवसीय सामन्यात ऑस्ट्रेलियाने इंग्लंडचा 3 धावांनी पराभव केला. यासह 3 सामन्यांची वनडे मालिका 1-1 अशी झाली. पहिला एकदिवसीय सामना इंग्लंडने जिंकला होता, तिसरा सामना 18 जुलै रोजी टॉंटन येथे खेळवला जाईल. साउथहॅम्प्टन येथे रविवारी झालेल्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात इंग्लंडला शेवटच्या षटकात 15 धावांची गरज होती.**

शतक झळकावणाऱ्या नताली सीव्हर-ब्रंटने 5 चेंडूत 10 धावा केल्या. शेवटच्या चेंडूवर 5 धावा आवश्यक असताना, ब्रंटने मिड-विकेटच्या दिशेने स्लॉग स्वीप खेळला, परंतु सीमारेषेवर क्षेत्ररक्षकाने तिचा झेल घेतला. सीव्हरला केवळ एकच धाव घेता आली आणि इंग्लंडचा संघ 3 धावांनी पराभूत झाला. ऑस्ट्रेलियाने लेगस्पिनर अलाना किंगच्या रूपाने अतिरिक्त फिरकीपटूला संधी दिली होती. तिने अवघ्या 44 धावा देऊन इंग्लंडच्या टॉप ऑर्डरला धावा करण्यापासून रोखले आणि 3 बळीही घेतले. या कामगिरीसाठी तिला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला.

नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजीला उतरलेल्या ऑस्ट्रेलियन संघाची सुरुवात खराब झाली. संघाने पहिली विकेट 7 धावांवर आणि दुसरी विकेट 27 धावांवर गमावली. सलामीवीर फोबी लिचफिल्ड 4 आणि कर्णधार ॲलिसा हिली केवळ 13 धावा करू शकल्या. तिसऱ्या क्रमांकावर उतरलेल्या एलिस पेरी आणि बेथ मुनी यांनी ऑस्ट्रेलियाचा डाव सांभाळला. दोघांनी 61 धावांची भागीदारी केली होती. मात्र 33 धावा करून मुनी बाद झाला. पेरीने एक बाजू लावून धरली, पण ताहलिया मॅकग्रा 5 धावा करून




### 6 चेंडूत 15 धावा हव्या होत्या

अखेरच्या षटकात इंग्लंडला 15 धावांची गरज होती. ऑस्ट्रेलियाकडून डावखुरी फिरकी गोलंदाज जेस जोनासेन गोलंदाजीसाठी आली. पहिल्या दोन चेंडूंवर प्रत्येकी एक धाव आली. तिसऱ्या चेंडूवर ब्रंटने लाँग लेगच्या दिशेने चौकार मारला. चौथ्या आणि पाचव्या चेंडूवर 2-2 धावा झाल्या, आता शेवटच्या चेंडूवर 5 धावा हव्या होत्या. जोनासेन मिडल स्टंपवर फुलर लेन्थ बॉल टाकते, सीव्हर स्लॉग स्वीप खेळते, चेंडू डीप मिड-विकेटच्या दिशेने हवेत जातो. लाँग-ऑनवर असलेल्या फील्डरने टॅपमध्ये चेंडू पकडला, सीव्हर फक्त एक धाव घेऊ शकली आणि इंग्लंडने सामना 3 धावांनी गमावला.

बाद झाली. एलिस पेरीने एका टोकाकडून लागोपाठ धावा केल्या. तिने प्रथम ॲशले गार्डनरसोबत 56 धावांची भागीदारी केली आणि त्यानंतर ॲनाबेल सदरलँडसोबत 81 धावांची भागीदारी केली.

गार्डनर 33 धावांवर बाद झाली, पेरीने तिच्या संघाला 200 च्या पुढे नेले, परंतु तिचे शतक पूर्ण करण्यापूर्वी ती 91 धावांवर बाद झाली. सदरलँडही आपले अर्धशतक पूर्ण करून बाद झाली.ऑस्ट्रेलियाने 49 षटकात 256 धावा केल्या होत्या, लॉरेन बेल इंग्लंडकडून शेवटचे षटक टाकण्यासाठी आली होती. जॉर्जिया वेअरहॅमने तिच्या षटकातील पहिल्या दोन चेंडूंवर दोन षटकार ठोकले. तिने या षटकात एकूण 3 षटकार आणि 2 चौकार मारले आणि संघाची धावसंख्या 7 विकेट्सवर 282 पर्यंत नेली. 14 चेंडूत 37 धावा केल्यानंतर ती जेस जोनासेन (5 धावा) सोबत नाबाद राहिली.

इंग्लंडकडून सोफी एक्लेस्टन आणि लॉरेन बेल यांनी 3-3 बळी घेतले. सारा ग्लेनला तिथे एक विकेट मिळाली.283 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंड संघाकडून सोफिया डंकले आणि टॅमी ब्युमॉंट सलामीला आल्या. डंकले 13 धावा करून बाद झाली तेव्हा दोघांनी 60 धावांची भागीदारी केली. नंबर-3वर उतरलेल्या नताली सीव्हर-ब्रंटने इंग्लंडचा डाव सांभाळला, तिचा एक झेलही सुटला. सीव्हर टिकून राहिली, पण तिच्यासमोर टॅमी ब्युमॉन्ट 60, कर्णधार हीदर नाइट 12, ॲलिस कॅप्सी 2 आणि डॅनियल व्याट 8 धावांवर बाद झाल्या. सातव्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या एमी जोन्ससोबत सीव्हरने 57 धावांची भागीदारी केली. जोन्स 37 धावा करून बाद झाली तेव्हा संघाची धावसंख्या 200 च्या पुढे गेली होती. 203 धावांच्या सांघिक धावसंख्येवर सोफी एक्लेस्टोनही पॅव्हेलियनमध्ये परतली. 39 व्या षटकात 7 विकेट्स गमावल्यानंतर, सारा ग्लेन आणि सीव्हर-ब्रंट यांनी भागीदारी रचण्यास सुरुवात केली. दोघींनी सामना शेवटच्या षटकापर्यंत नेला, त्याच दरम्यान ब्रंटने आपले शतक पूर्ण केले. संघाने 49 षटकात 268 धावा केल्या, या षटकापर्यंत ऑस्ट्रेलियाची धावसंख्या 256 धावा होती.

---

# कार्लोस अल्कारेज नवा विम्बल्डन चॅम्पियन

## » 23 वेळचा ग्रँडस्लॅम विजेता जोकोविचचा केला पराभव

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**रविवारी रात्री उशिरा टेनिस जगताला नवा स्टार मिळाला. 20 वर्षीय कार्लोस अल्कारेजने विम्बल्डन पुरुष एकेरी अंतिम विजेतेपद पटकावले. त्याने 4 तास 42 मिनिटे चाललेल्या सामन्यात 36 वर्षीय नोव्हाक जोकोविचचा 1-6, 7-6, 6-1, 3-6, 4-6 असा पराभव केला. सलग 4 वेळा विजेतेपद पटकावत सर्बियाच्या जोकोविचने 10 वर्षांनंतर विम्बल्डनची अंतिम फेरी गमावली. 2013 मध्ये अंतिम फेरीत त्याला ग्रेट ब्रिटनच्या अँडी मरेने पराभूत केले होते.**

जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानावर असलेल्या अल्कारेजने जागतिक क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर असलेल्या जोकोविचची सलग ३४ विजयांची मालिकाही खंडित केली. चॅम्पियनशिपमध्ये फक्त १२ वा सामना खेळणाऱ्या स्पॅनिश तरुण अल्कारेजचे हे पहिले विम्बल्डन विजेतेपद होते. टेनिसमधील हे त्याचे दुसरे ग्रँडस्लॅम आहे, त्याने गेल्या वर्षी यूएस ओपन जिंकले होते. विम्बल्डन 2023 चा चॅम्पियन कार्लोस अल्कारेज म्हणाला, 'हे माझ्यासाठी स्वप्न पूर्ण झाल्यासारखे आहे. वयाच्या अवघ्या 20 व्या वर्षी मी विम्बल्डनचा चॅम्पियन होईल असे मला कधीच वाटले नव्हते. मला

### अल्कारेज कोण आहे?

कार्लोसचा जन्म 5 मे 2003 रोजी स्पेनमध्ये झाला. कार्लोसने वयाच्या 4 व्या वर्षी टेनिस खेळायला सुरुवात केली. त्याला त्याचे वडील कार्लोस अल्कारेज गोंगलेझ यांच्याकडून प्रेरणा मिळाली, ज्यांची स्पेनमधील टॉप-40 टेनिसपटूंमध्ये गणना होते. अल्कारेजचे प्रशिक्षक अव्वल मानांकित माजी खेळाडू जुआन कार्लोस फेरेरो आहेत. त्याच्या मार्गदर्शनाखाली कार्लोसने वयाच्या १५ व्या वर्षी व्यावसायिक टेनिस खेळायला सुरुवात केली. अल्करेज टेनिस इतिहासातील अशा काही खेळाडूंपैकी एक आहे ज्यांनी पदार्पणाच्या ग्रँड स्लॅमच्या पहिल्या फेरीत हरले नाही.

माझा अभिमान आहे. मी सध्या ग्रास कोर्टच्या पूर्णपणे प्रेमात आहे. जोकोविचने सामन्यानंतर सांगितले की, अल्कारेज विजयासाठी पात्र आहे. त्याने मला कोर्टात खूप त्रास दिला. याआधी मला क्ले कोर्ट आणि हार्ड कोर्टवर समस्या येत होत्या, पण अल्केरेज ज्या पद्धतीने ग्रास कोर्टवर खेळला आहे तो विलक्षण आहे. या सामन्याबाबत जोकोविच म्हणाला की, या कोर्टवर मी अनेक सामने जिंकले आहेत. या कोर्टवर हरणे माझ्यासाठी भावनांनी भरलेले असेल. जेंटलमेन्स सिंगल्स चॅम्पियन अल्कारेज आणि लेडीज सिंगल्स चॅम्पियन मार्केटा वोंड्रोसोवा यांना विम्बल्डनमध्ये सुमारे 24.49 कोटी रुपये मिळाले. तर उपविजेत्या जोकोविचला 12.25 कोटी रुपयांची बक्षीस रक्कम देण्यात आली. गेल्या वर्षी पुरुष आणि महिला चॅम्पियन्सना सुमारे 20.85 कोटी रुपये मिळाले होते.

